ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 11 | JULY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# डॉ. वॉल्टर स्पिन्क व ऐतिहासिक अंजिठालेनी



**डॉ. लदाफ एस.के.**
**इतिहास विभाग, आझाद महाविद्यालय,**
**औसा ता. औसा जि. लातूर**

**प्रस्तावना:-**

विविध टप्यांवर अजिंठालेणींच्या आयुष्यात अनेक नाट्यमय घडामोडी घडत आल्या आहेत. २८ एप्रिल १८९९ रोजी कॅप्टन जॉनस्मिथ याला फर्दापुरच्या छावणीत मुक्कामी असताना शिकारीच्या निमित्ताने अजिंठालेणी सापडल्या अनेक काळाच्या पडद्याआड लपलेल्या ऐतिहासक ठेवा जगा समोर आला  विस्मृतीत गेलेल्या अजिंठा लेणींच्या शोधाला या वर्षी २०० वर्षे पुर्ण होत आहेत. आणि २३ नोव्हेंबर रोजी अजिंठाशी ऋणानुबंध असलेला एक प्रतिभावंत संधोधक,गुरु प्रा. डॉ. वॉल्टर स्पिन्क काळाच्या पडद्याआड गेल्यामुळे यांची दखल म्हणुन घेण्यात येत आहे. गेली दोनशे शतके परदेशी संशोधक भारतात येऊन भारताच्या ऐतिहासीक सत्याचा शोध घेत आहेत. त्याच भारत प्रेमीची परंपरा जपत हार्वर्ड विद्यापीठात कला इतिहासाचे शिक्षण घेत असताना डॉ. वॉल्टर स्पिन्क भारतात आले. तेव्हां अजिंठा लेणीवर काम करावे असे त्यांच्या ध्यानी नव्हते परंतु शोधनिबंधासाठी लेणींच्या अभ्यासात अजिंठ्याला येणे क्रमप्राप्त होते. अजिंठ्याभेटीत या जागेने त्यांच्यावर जेकांही विलक्षण झाले ते आयुष्याच्या शेवटपर्यंत राहिले. साधारणतः अभ्यासक किंवा प्रवासी अजिंठ्याच्या चित्राकडे अधिक आकृष्ट  होतो पण डॉ. वॉल्टन स्पिन्क यांचे मुख्य प्रेम हे कलेवर होते. लेणी पाहताना त्यांनी त्यांच्या काळाबद्दल निर्मिती बद्दल असंख्य प्रश्न निर्माण झाले होते.? आणि त्याचा ठाव घेत त्यांनी कलेच्या अभ्यासाची बैठक बसविली रस ग्रहणासाठी, मनोरंजनासाठी कला असा पारंपारीक विचार बहुतांश समाज करत असताना इतिहासाचे लहान मोठे पैलु समजुन घेण्यासाठी कला असा अभिनव पुरातत्त्वीय दृष्टीकोण घेऊन स्पिन्क यांनी कला इतिहास संधोधनाची इमारत उभी केली. हे करताना त्यांनी विस्मृतीत गेलेल्या वाकाटक , गुप्त , राजांना समकालीन असलेला राजांश अजिंठा लेणी निर्मितीला कसा कारणीभुत ठरला आहे. डॉ. वाल्टन स्पिन्क यांनी चांगल्या पध्दतीने मांडण्याचा प्रयत्न केला. १

एक दिवस किंवा कांही तासात अजिंठा लेणी पाहणाऱ्यांना डॉ. वाल्टन स्पिन्क यांचा १९५४ पासुन सुरु असलेला लेण्यांचा अभ्यास खरेतर गुंतागुंतीत टाकणारा ठरेल जर पावसाळ्यात आणि हिवाळ्यात महिनो महिने फरदापुर विश्रामगृहात मुक्काम करुन डॉ. वॉल्टर स्पिन्क यांनी लेण्यांमधील खोदकामाचे बारकाईने पाहत असत. त्यातल्या चुका बद्दल फरक, नोंदवत असत त्यातुन अनावर्थ काढत कला इतिहास अभ्यासाची नवीन भाषा निर्माण केली हे करताना त्याची वाकाटक काळातील म्हणजे पाचव्याशतकातील संस्कृतीक बद्दल उभे करुन त्यात अनेक तपशीलांचे रंग भरले. त्यामुळे एकच लेणी जागेपूर्ता किंवा राजवुशापुर्ता या अभ्यासाचा मर्यादा न राहता मुख्य पुव्याच्ये रेलचेल असलेले पाचव्या शतकातील भारताचे संस्कृतीक राजकिय धार्मीक चित्र आपल्यासमोर डॉ. वाल्टर स्पिंन्क त्यांच्याकामाची दखल अंतर राष्ट्रीय पातळीवर वेळोवेळी घेतली जात असतात. नेदरलॅड येथील ब्रिल या अंतरराष्ट्रीय प्रकाशन संस्थेने त्यांचे संशोधन कार्य सात खंडामध्ये प्रकाशीत केले आहे. आठवा प्रकाशनाच्या मार्गावर होता. हे अजिंठा : हिस्टरी ॲण्ड डेव्हलपमेन्टचे विविध खंड लेण्यांच्या विकास निर्मितीच्या पैलुवर विस्तृत मांडणी करतात. पहिला खंड, द एण्ड ऑफ द गोल्डन इरा. या आपल्या पाचव्या शतकातील वाकाटक राजा हरिषेण्याच्या राज्यअस्ताची कथा अजिंठाच्या भव्य पटलावर डॉ. स्पिन्क यांच्या मनोरंजक आणि प्रभावी शैलीत आणि प्रभावी शब्दांत वाचायला मिळते. अजिंठा लेण्यासारखे शांत व बौध धार्मिक उपासणेच्या निर्मिती मागील अभुतपुर्व राजकीय गदरोळाची नाट्यमय कथा डॉ. स्पिन्क यांनी पहिल्या खंडात एका महाकाव्या प्रमाणे रंगवली आहे.

अजिंठा येथे लेणी निर्मिती झाली. दोन टप्प्यात त्यातल्या सातवाहन कालीन कालखंडात वाघूर नदिच्या प्रशस्त नागमोडी वळणावर मध्यभागी कांही बौध चैत्य आणि विहार इ.स. पूर्व पहिल्या शतकात खोदण्यात आले. यासाठी व्यापारी आणि विविध नागरींकांनी देणग्या दिल्या होत्या.[२]

पुढे तीन शतकांच्या निद्रेय नंतर या दरीला जाग आली. ती उपेन्द्रगुप्त या वाकाटकाच्या मांडलीक आणि ऋषिक समूहाच्या राज्याचा बौध धर्म प्रेमामुळे या तीन शतकात बौध्उ धर्माचे स्वरुप कमालीचे बदलले होते आणि त्यात बौध्द धर्माचे विविध पंथामध्ये विविध विकास आणि विभाजन झाले होते. बोधिसत्त्वाचा आदर्श ठेवुन धार्मि कार्यातुन पुण्यप्राप्त होते. हे मुख्य धैर्य बनले होते. त्यातूनच ऋषिक राजा उपेंद्रगुप्त आणि वाकाटकांचा प्रधानमंत्री वराहदेव यांनी जुन्या लेण्यांच्या बाजूला नवीन राजप्रासादसदृश बौध विहारनिर्मितीचा बृहद्द प्रकल्प सुरु केला. त्यात वाकाटकांचे मांडलीक अश्मक देशाच्या (औरंगाबाद)अश्मक राजाने एका टोकापासुन लेणी खोदण्यास प्रारंभ केला बरोबरीने मथुरासारखे मोठे व्यापारी आणि धनाढ्यांच्या लेणी खोदण्यास सुरुवात झाली. थोडा उशीराने का होईना मुळात परममाहेश्वर असलेल्या पश्चिम वाकाटक सम्राट हरीसेन यांनी बौध लेणी प्रसादनिर्मितीमध्ये उडी घेतली. आणि त्यातच ऋषिक आणि अश्मकांमध्ये बेबनाव होऊन अश्मकांनी उपेंद्रगुप्ताच्या राज्यावर चढाई केली. आणि या राजकीय घडामोडीमुळे उपेंन्द्रगुप्ता शत्रु राज्याच्या लेण्यांचे काम बंद ठेवले आणि या सत्तासंघर्षात अजिंठा लेण्यांच्या खोदकामास अडथळे येत गेले तरीही तीन शतकांच्या खंडामुळे सुरुवातीला चाचपडणारी कारागीर पीढी नवनवीन तंत्रज्ञान शिकुण लेणी निर्मितीत त्यांचा उपयोग करु लागली सर्वोत्तम शिल्पकला निर्मितीची एक चढावढ सुरु झाली होती.३

पाचव्या शतकातील सम्राट हरिसेन हा त्या काळातील बहुधा जगातील सर्वात मोठा सम्राट असावा. पुर्व आणि पश्चिम समुद्रापर्यंत पसरलेल्या राज्यांच्या या अधिनस्वामींनी अनेक छोट्या मोठ्या राज्यांना मांडलीक केले होते. आणि समुद्री मार्गे व्यापाराद्वारे राज्यात सुब्धता निर्माण केली होती. त्या काळाच्या वैभवाचे , विकासाचे , अभिजात सौंदर्य यथार्थ प्रतिबिंब अजुनही अजिंठा चित्रामध्ये जिवंत आहे. कोरीव दगडातील लेण्यामधील राजवाडे भव्य परवत वनराजी आणि नगर संस्कृतीचे साकारलेले दृष्य या निश्चितच समकालीन जिवनाचा आरसा आहे. राजाश्रयाने निर्माण झालेले भव्य बौध्द प्रसार, शिल्प आणि चित्रकला हे तत्कालीन स्वर्ण युगाचे संकेत अजिंठा लेणीत कारागीराने घडविले होते. इकडे आश्मक-ऋष्क्रिक संघर्षात धार्मिक वृत्तीच्या उपेंद्रगुप्ताचा पराभव होउुन त्याच्या लेण्यांचे काम थांबले आणि आश्मकांची ऋषिकांच्या लेणींच्या विध्वंस करत आपल्या लेणींचे काम वेगाने सरु केले होत असताना, एक भयंकर कट करुन अश्मकांनी सम्राट हरिषेणाचा मृत्यु घडवुन सत्तापालट करविला आणि हरिसेनचा पुत्र सर्वसेन या तुलनेने दुर्बल मुलाला राज्यपदी बसविले अशा धामधुमित अजिंठा लेणींच्या कामात मोठी खींळ बसली आणि अश्मक सोडले तर लेणींचे काम ठप्प झाले. राजाश्रयाने चालु झालेला काम पुर्णत्वास नेण्याची बौध आचार्यांनी धडपड केले. पण जनसामान्यांची किरकोळ पुण्यार्थ वगळता अजिंठाचा आश्रय तुटला आणि एखादा दुसरा अपवाद वगळता अजिंठा लेणी काळाच्या पडद्या आड गेले हे सर्व घडले अवघ्या १८ वर्षात (इ.स. ४६२ ते ४८०) असा क्रांतीकारी सिध्दां डॉ. स्पिन्क यांनी शॉर्ट 'क्रोनोलॉजी' मध्ये मांडला हे ऐकूण भारतातील इतिहास अभ्यासकात प्रचंड खळबळ माजली आणि असा चमत्कृतीपूर्ण दावा मानायचा कि नाही या बद्दल अभ्यासकांचे दोन गट पडले. मुख्यतः शिलालेख आणि इतर लिखीत साहित्याचे आधारे अजिंठा लेणी अभ्यासकांना हा दावा पटणार नाही. यासाठी ज्या अनेक गृहीतकांच्या आधारे डॉ. वॉल्टर स्पिन्क यांनी अजिंठ्याचा अभ्यास उभा केला आहे. त्या कला - स्थापत्य साधनांचा वापर आणि अन्वयार्थ समजून घेणे आवश्यक आहे. विविध अभ्यासकांनी त्यांच्या मांडणीवर घेतलेल्या आक्षेपांचे खंडनमंडन त्यांनी त्यांच्या दुसऱ्या खंडात 'आर्ग्युमेंन्टस अबाऊट अजंठा' केले आहे. हे करताना समकालीन लिखीताने घटोत्कच, औरंगाबाद, पितळखोरे, बानोटी अशा संबंधीत स्थळांमधील पुराव्यांचा समावेश केला आहे. तसेच हरिषेणाच्या मृत्यूनंतरच्या राजकीय घडामोडी त्यानी उत्तरकालीन 'दशमुमार चरित' दण्डी लिखित ग्रंथातील घटनांच्या आधारे स्पष्ट केल्या आहेत. हे करताना त्यांनी पठडीतील इतिहास संधोधकापलीकडे जाऊन , एखाद्या सिध्दहस्त कवीप्रमाणे पण सैध्दांतिक मुल्यांशी तडजोड न करता प्रतिभा दाखवली आहे. इतकेच नाही, तर अनेक दशके त्यांनी 'अजिंठा साईट सेमिनार' सेमीनार राबवुन त्याची मांडणी विद्यार्थी शिक्षक आणि संशोधकापर्यंत पोहचवली आहे. आज अभ्यासकांना देशी आणि परदेशी संशोधक त्यांचे संधोधन मान्य करीत आहे. 'द अरायव्हल ऑफ द इनइन्व्हायटेड' या अजिंठा इतिहासावरील तिसऱ्याखंडात त्यांनी सम्राट हरिसेनच्या मृत्यु नंतरच्या अजेंठा येथल लेणी विकासावर लिहीले आहेत. राजाश्रय तुटल्याने अनेक जनसामान्यांना अजिंठाच्या बौध प्रासादात छोट्या मोठ्या प्रतिमांसाठी, चित्रांसाठी पुण्य दान करण्यासाठी संधी मिळाली त्यातुन मुळच्या बौध्द प्रसाद आराखड्याला छेद देणारी नवीन धार्मिक कल्पना सुसंगत अशी शिल्प आणि चित्रनिर्मिती झाली. लेणी मधील शिस्त मोडुन अनाहुत शिल्प आणि चित्रांची लेणी व्यापल्या कांही

काळापुर्ती बौध्द, पुजाआर्चा सुरु झाली होती. हे डॉ. वॉल्टर स्पिन्क यांनी दाखवुन दिले आहे. पुढे मात्र राजकिय परिस्थिती चिघडल्यावर कारागिर दान करते सोडुन गेले आणि सर्व काम थांबले आज अजिंठ्याची एक ही लेणी ते आर्थी पुर्ण नाही.४ चौथ्या खंडात 'अजिंठा हिस्ट्री ॲण्ड डेव्हलप मेंन्ट ' इयर बाय इयर – डॉ. वाल्टर स्पिन्क यांनी पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील लेणी कशा कशा घडल्या याचा वार्षिक आढावा घेतला आहे. हे करताना डॉ. स्पिंन्क यांनी खुप तपशिलातुन व सखोल अभ्यासातुन जाऊन कारागिरांची काम करण्याची पध्दत स्थपती, दानकर्ते व बौध धर्म आचार्य यांच्यातील समनवय निवडीचे निकश, तंत्रज्ञानामधील विकास, विविध कला, प्रभाव, राजकिय परिस्थितीचे घटनास्थळी पडणारे पडसाद, इतकेच काय तर , होणाऱ्या चुकांचीही मांडणी किंवा आढावा घेतला आहे. 'पाचवा खंड केव बाय केव' म्हणजे त्यात्या लेणींचा चरित्र वृत्तांत आहे. सर्वत्रकृष्ट आणि सर्वार्थाने राजस असणारी पहिले लेणी हे पुर्ण अर्थाने सम्राट हरिसेनाचे लेणी कसे आहे. डॉ. वॉल्टर स्पिन्क सिध्द करतात.५.

सातव्याखंडात 'डिफायनिंग फीचर्स' डॉ. स्पिन्क आपल्यासमोर तयांच्या खेळातले पत्ते उघडे करतात. वरील सांगितल्याप्रमाणे कला स्थापत्य संशोधनाची भाषा त्यांनी वाकाटक काळासाठी निश्चित केली आहे. स्तंभ , द्वारशाखा, चंद्रशिला,बुध्दाच्या मुर्तीमध्यले बदल, स्तंभर्शीर्ष, खिडक्या दरवाजाचे चौकटी, रंगकामातील बारकावे, इ. अशा अनेक स्थापत्य घटकांना मुळाक्षरे माणुन त्यातील बदल स्थल काळाच्या पटावर निटमांडुण सुसंगती लावली आहे. हि सुसंगती अन्वयार्थ लावण्याची विलक्षण संशोधन पध्दत त्यांनी शोधली आहे. आज फक्त अजिंठाच नाही, तर इतर अनेक खोदीव लेणी अभ्यासात या नव्या पुरातत्त्व पधतीचा उपयोग होऊ शकतो सातव्या खंडात बाघ दन्डीन सेल्स ॲण्ड सेल्स डोअरवेज मध्य प्रदेशातील वाघ लेनी आणि अजिंठा याची तुलना करुन अजिंठावरील वाघलेणीमधील तंत्रज्ञानाचा प्रभाव विषध केला आहे.

## सारांश :

अलिकडे डॉ. वाल्टर स्पिन हे आठव्या खंडावर काम करीत होते त्यात  वाकाटकानंतर इतिहासाला मिळणारी कलावटणी आणि कलचुरी राजवटीचा उद्य हे होते. दशमुकार चरित्राच्या आधारे स्पष्ट करणारे होते. तसेच अजिंठा लेणींचे उत्तरकालीन कलचुरी आणि इतर लेणींवरील प्रभाव दृश्य स्वरुपात प्रस्थापित करण्याचा त्यांचा मानस होता.

या पुस्तकांव्यतिरिक्त त्यांनी 'अजिंठा टु एलोरा' हा ग्रंथ लिहुनपश्चिम भारतातील लेणी निर्मिती परंपरेवर सैध्दांतिक निवेचन केले आहे. तसेच अजिंठा : 'ए ब्रीफ हिस्टरी ॲण्ड गाइड' या छोट्या पुस्तकातुन त्यांनी हा विषय पर्यटकांना सोप्या भाषेत समजेल अशी चरीत्र मांडणी केली आहे. डॉ. वाल्टर स्पिंक यांनी अजिंठा या जागतिक ऐतिहासिक वारसा स्थळाचा दीर्घकाळ अभ्यास करुन त्याचे विविध पैलू शास्त्रीय पध्दतीने भारतीयांच्या नजरेस आणून दिले या असामान्य कार्यामुळेते अजिंठा लेणींच्या इतिहास - संस्कृतीचे खऱ्या अर्थाने डॉ वॉल्टर स्पिन्क आश्रयदाते ठरतात.

## संदर्भ :


| | |
|---|---|
| **१. दैनिक, लोकसत्ता,** | **दि. ३० नोव्हेंबर २०१९** |
| **साईली पलांडे दातार** | **पृष्ठ क्र. ०६** |
| **लेखिका इतिहास पुरातत्त्व संशोधक** | |
| **२. कित्ता** | **पृष्ठ क्र. ०६** |
| **३. कित्ता** | **पृष्ठ क्र. ०६** |
| **४. दैनिक लोकसत्ता** | **पृष्ठ क्र. ०६** |
| **५. डॉ. वाल्टर स्पिन्क** | **अजिंठा हिस्ट्री ॲण्ड डेव्हलपमेंन्ट** |
| | **इयर बाय इयर खंड - ४** |
| **६. कित्ता** | **पृष्ठ क्र. ०६** |


## संदर्भ ग्रंथ :


| | | |
|---|---|---|
| **१. देव पी. आर** | - | **टेंम्पल ऑफ मराठवाडा** |
| **२. देगलुरकर जी.बी.** | - | **टेंम्पल ऑफ महाराष्ट्र** |
| **३. जेन्स फर्ग्युसन, जे बर्जेस** | - | **दि केव्ह टेंम्पल्स ऑफ इंडिया** |
| **४. हरे विष्णु सरकार** | - | **स्टडीज इन अर्ली बुध्दिष्ट** |

आर्केटेक्चर ऑफ इंडिया
५. वॉल्टर स्पिंन्क - अजिंठा टु ऐलोरा
६. सुंदरराजन - दि. केव्ह टेंम्पल्स ऑफ डेक्कन
७. डॉ. ए घोष - अजिडा मुयरल्स
८. महाराष्ट्र राज्य गॅझिटर - स्थापत्य कला महाराष्ट्र इतिहास
प्राचिन काळ खंड २ रा भाग २
महाराष्ट्र शासन - मुंबई